# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 18 August 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १८ ऑगस्ट २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- राज्यात अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस, नद्यांच्या पाणी पातळीत वाढ, पिकांचं नुकसान
- नांदेड जिल्ह्यात मुखेड तालुक्यात अतिवृष्टी, पाच नागरिक बेपत्ता
- अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या भागांचे पंचनामे करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश

आणि

- भारतीय हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांच्यासंदर्भात लोकसभेत चर्चेला सुरुवात, विरोधकांच्या गदारोळामुळे कामकाज दिवसभरासाठी स्थगित

****

राज्यात अनेक ठिकाणी आज मुसळधार पाऊस सुरू आहे. अनेक नद्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली असून, धरणांमधून पाण्याचा विसर्ग सुरु आहे. सतत होत असलेल्या मुसळधार पावसामुळे राज्यात पूरसदृश स्थिती निर्माण झाली आहे. हवामान विभागाने आज मुंबई, ठाणे, रायगड आणि पुणे घाट, सातारा घाट, रत्नागिरी, कोल्हापूर घाट या भागांना रेड अलर्ट तर, पालघर, सिंधुदुर्ग, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, अमरावती, चंद्रपूर आणि गडचिरोली या भागात ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

मुंबई आणि उपनगरात आज सकाळपासून जोरदार पाऊस सुरु आहे. आज सकाळी साडे ८ ते साडे ११ या तीन तासाच्या कालावधीत सांताक्रूझ वेधशाळेत सुमारे ४७ मिलिमीटर तर कुलाब्यात २९ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. शहर आणि

उपनगराच्या सखल भागात पाणी साचलं असून वाहतूक मंदावली आहे. नवी मुंबई आणि परिसरातही सकाळपासून पावसाची संततधार सुरू आहे.

****

नांदेड जिल्ह्यात मुखेड तालुक्यात अतिवृष्टीमुळे लेंडी धरणाच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाली आहे. रावणगाव इथं पुराच्या पाण्यात अडककेल्या २२५ नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आलं आहे. पाच नागरिक बेपत्ता असून, त्यांचा शोध घेतला जात आहे. हसनाळ इथं आठ, भासवाडी इथं २० तर भिंगेली इथं ४० नागरिक अडकले आहेत. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या पथकामार्फत बचाव कार्य सुरु असल्याची माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी दिली.

**बाईट – जिल्हाधिकारी राहुल कर्डीले**

****

हिंगोली जिल्ह्यातही पावसाचा जोर वाढला असून, ईसापूर आणि सिद्धेश्वर धरणातून पाण्याचा विसर्ग सुरु आहे. परभणी जिल्ह्यातल्या निम्न दूधना धरणाचे दरवाजे उघडण्यात आले असून त्याद्वारे एकूण दोन हजार ६३८ घनफूट प्रतिसेकंद वेगाने पाण्याचा विसर्ग सुरु आहे.

****

बीड जिल्ह्यातल्या १६ महसुली मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली. परळी वैद्यनाथ तालुक्यातल्या बहुतांश भागात अतिवृष्टी झाली असून, नद्यांना पूर आला आहे. कौडगाव हुडा इथल्या तरुणांची कार गाव नदीच्या पुरात वाहून गेली. यापैकी तिघांना वाचवण्यात आलं असून, एकाचा मृतदेह सापडला.

जिल्ह्यात अनेक नद्यांना पूर आले असून, प्रशासन अलर्ट मोडवर आहे. नागरिकांनी नदीकाठी जाणं टाळावं, नदी काठी राहणाऱ्या नागरिकांनी अधिक काळजी घ्यावी तसंच कोणतीही आपत्ती उद्भवत असल्यास तातडीने सुरक्षित स्थळी जावं, असं आवाहन आमदार धनंजय मुंडे यांनी केलं.

****

जालना जिल्ह्यातल्या बहुतांश भागात आज सलग तिसऱ्या दिवशीही पाऊस सुरू आहे. त्यामुळे नदी नाल्यांना पूर आला असून, पिकांमध्ये पाणी साचलं आहे. जालना शहराला पाणीपुरवठा होत असलेलं घाणेवाडी इथलं संत गाडगेबाबा जलाशय पूर्ण क्षमतेने भरलं असून, शहरातून वाहणाऱ्या कुंडलिका नदीला पूर आला आहे. घनसावंगी तालुक्यातल्या गोदावरी नदीवरील राजाटाकळी, जोगलादेवी आणि

मंगरुळ उपसा बंधारे पूर्ण क्षमतेने भरल्यानं तिनही बंधाऱ्यातून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे गोदावरी नदीपात्रालगतच्या गावांना सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे.

****

सातारा जिल्ह्यात कोयना धरणाचे दरवाजे उघडले असून, एकूण २१ हजार ३०० घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाण्याचा विसर्ग सुरु आहे.

रत्नागिरी-कोल्हापूर महामार्गावर संगमेश्वर तालुक्यात आंबा घाटात दरड कोसळल्यामुळे वाहतूक ठप्प झाली होती. खेडमधली जगबुडी, संगमेश्वर मधली शास्त्री आणि राजापूर मधली कोदवली या नद्यांनी इशारा पातळी ओलांडली आहे. नारिंगी नदीचं पाणी रस्त्यावर आल्यानं खेड-दापोली मार्ग बंद झाल्याचं अआमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज राज्यातल्या पावसाचा आढावा घेऊन, अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या भागांचे पंचनामे करण्याचे आदेश दिले. मराठवाड्यातल्या ८०० गावांना अतिवृष्टीचा फटका बसला असून, एक लाख हेक्टर शेतीचं नुकसान झाल्याचं त्यांनी सांगितलं.

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

****

गेल्या काही दिवसांपासून संततधार पावसामुळे शेतीचं प्रचंड नुकसान झालं असून, अनेक ठिकाणी घरांचं, रस्त्यांचं आणि सार्वजनिक मालमत्तेचंही मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे. अशा परिस्थितीत शेतकरी आणि नागरिकांनी खाबरुन जाऊ नये, शासन आपल्या पाठिशी उभं असल्याचं, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितलं. ते म्हणाले –

**बाईट – कृषीमंत्री दत्तात्रय भरणे**

अतिवृष्टीमुळे निर्माण होणाऱ्या पूर परिस्थितीमुळे राज्यात शेत पीक, फळ बागांचं नुकसान झाल्यास संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी नुकसानीचे पंचनामे तातडीने करून त्याचा अहवाल विनाविलंब सादर करावा, असे निर्देश मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिले.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी तात्काळ पंचनामे करण्याची, तसंच २४ तास तक्रारी स्विकारण्यासाठी तालुकानिहाय तक्रार केंद्र उभारण्याची मागणी छत्रपती संभाजीनगचे खासदार संदिपान भुमरे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

****

संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज आज सकाळच्या सत्रात विरोधकांच्या गदारोळामुळे बाधित झालं.

राज्यसभेत दुपारनंतर कामकाज सुरु झाल्यावर भारतीय बंदरे विधेयक २०२५ मंजूर झालं. ब्रिटीशांनी १०० वर्षांपूर्वी जो कायदा तयार केला होता, तो आता कमजोर झाला आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात कायदा आधुनिक, व्यवसायास आणि पर्यावरणास अनुकूल असावा, असं केंद्रीय बंदरे आणि नौवहन मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी यासंदर्भातल्या चर्चेला उत्तर देताना सांगितलं.

लोकसभेत दुपारच्या सत्रात काम सुरु झाल्यावर अध्यक्ष ओम बिर्ला यांनी भारतीय हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांचं अभिनंदन केलं. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर गेलेले पहिले भारतीय अंतराळवीर शुक्ला यांच्यासंदर्भात विशेष चर्चेत सर्व सदस्यांनी सहभागी होण्याचं त्यांनी आवाहन केलं. मात्र विरोधकांनी घोषणाबाजी करण्यास सुरुवात केली. त्यातच विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री जितेंद्र सिंह यांनी बोलण्याचा प्रयत्न केला. मात्र गदारोळ वाढत गेल्याचं लोकसभेचं कामकाज दिवसभरासाठी स्थगित झालं.

****

शुभांशु शुक्ला आणि इसरो मिशन पायलट यांचा आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक प्रवास आणि त्यानंतरच्या परतीविषयी विशेष चर्चेदरम्यान विरोधकांनी सभागृहात गोंधळ घालणं, हे अत्यंत दुर्दैवी असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. विरोधक चर्चेत सहभागी होऊ शकले असते आणि भारताच्या अंतराळ कार्यक्रमासाठी रचनात्मक पुनरावलोकन, टीका आणि सूचना देऊ शकले असते. २१ व्या शतकात भारताच्या वैज्ञानिक आणि धोरणात्मक दृष्टिकोनासाठी अत्यंत महत्त्वाचे असलेले अंतराळ सारखे विषय किमान पक्षपाती राजकारणाच्या वर ठेवले पाहिजे, असं सिंह यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात नमूद केलं.

****

महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार म्हणून निवड झाल्याबद्दल पंतप्रधान मोदींनी त्यांचं अभिनंदन केलं.

****

सरपंच संतोष देशमुख हत्याकांडातला आरोपी वाल्मिक कराडच्या जामिनावर ३० ऑगस्ट रोजी सुनावणी होणार असल्याची माहीती, विशेष सरकारी वकिल उज्वल निकम यांनी दिली. देशमुख हत्याकांड प्रकरणात आज बीड न्यायालयात सुनावणी झाली, त्यांनतर ते माध्यमांशी बोलत होते. वाल्मीक कराड याच्या वकिलाने त्याला जामीन मिळाला पाहिजे, याविषयी आज युक्तिवाद केला, त्याला आम्ही सकारण विरोध केला, अशी माहीत निकम यांनी दिली. खंडणी प्रकरणात विष्णू चाटे याने वाल्मिकला सहकार्य केलं असून, वाल्मीक कराडचा तो निकटवर्तीय असल्याचं न्यायालयाच्या लक्षात अणून दिलं, असंही निकम यांनी सांगितलं.

****

आज चौथ्या श्रावणी सोमवारी बीड जिल्ह्यात परळी इथं प्रभू वैद्यनाथाचं दर्शन घेण्यासाठी लाखो शिवभक्त दाखल झाले आहेत. दर्शन सुलभ व्हावं यासाठी वैद्यनाथ देवल कमिटीच्या वतीने विविध सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

****

महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलाच्या वतीने सार्वजनिक गणेश मंडळांना तात्पुरत्या स्वरूपात आणि त्वरित वीजजोडणीची सुविधा उपलब्ध करण्यात आली असून, या जोडणीसाठी घरगुती वीजदर आकारण्यात येणार आहे.

****

छत्रपती शिवाजी महाराज मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या कारवाई आठ किलो ५६२ ग्राम हायड्रोपॉनिक गांजा जप्त करण्यात आला.

****